ISSN-2320-449
RNI No.MAHAUL03008/13/2012-T
Impact Factor : 3.728

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journa

## SPECIAL ISSUE MARCH 2023

## कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी

राष्ट्रीय चर्चासत्र

## समकालीन मराठी साहित्यातील जाणिवा

दि.१६ मार्च २०२३

भाग दोन




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Chief Editor
Principal Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Editor
Prof.Ramesh B. Ringne

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | गरुड' झेप एक ध्येयवेडा प्रवासया ' आत्मकथनातून यशाचे शिखर गाठण्यासाठी व्यक्त झालेल्या जाज्वल्य जाणिवा | प्रा. खैरनार सुनिल त्र्यंबक | ०१ |
| २. | आंबेडकरी ओवीगीते आकलन आणि आस्वाद | डॉ. दिलीप सावंत | ०५ |
| ३. | समकालीन साहित्य समीक्षा :-'पाय आणि वाटा' मधील सामाजिक जाणिवा | श्री.भारत चिंतामणी बंडगर | १० |
| ४. | स्त्रीवादी जाणीवांच्या कविता | प्रा. डॉ. मुंढे केशर जगन्नाथ | १५ |
| ५. | समकालीन मराठी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्यातील जीवन जाणिवा | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे मिनाक्षी मोतीराम इंगळे | १९ |
| ६. | आदिवासी सामाजिक जीवन, जाणिवा | प्रा. संदीप भागु चपटे | २४ |
| ७. | 2001 ते 2005 या काळातील ग्रामीण कादंबरीतील स्त्री – चित्रण (विशेष संदर्भ : बारोमास 2002) सदानंद देशमुख | प्रा.डॉ. माधव बसवंते फुले रागिणी बाबुराव | २८ |
| ८. | समकालीन मराठी बालसाहित्यातील मूल्यात्मक जाणिवा (विशेष संदर्भ: आबा महाजन यांचे बालसाहित्य) | श्री.सोमेश्वर बबन ढगे | ३० |
| ९. | "वसंत फेणे लिखित 'मावळतीचे मृद्गंध' या कथासंग्रहातील समकालीन जीवनजाणीवा" | डॉ. संजय मेस्त्री कु. सीमा अशोक कदम | ३४ |
| १०. | शेतकऱ्यांचे बारामाही दुःख अभिव्यक्त करणारी कादंबरी 'बारोमास' | प्रा. डॉ. वैशाली धनविजय | ३८ |
| ११. | समकालीन मराठी साहित्यातील ग्रामीण जाणिवा | डॉ. वनिता बापू शिंदे | ४२ |
| १२. | २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तने | प्रा.वडितके शंकर गोरक्ष | ४६ |
| 13. | ललितलेखिका मंगला गोडबोले यांच्या ललितलेखातील स्त्रीजीवनदर्शन- | वर्षाराणी प्रदीप ढोरे | ५० |
| १४. | समकालीन ग्रामीण कादंबरी वाङ्मयातून अभिव्यक्त झालेल्या जाणिवा | अभिता बाजीराव निकम डॉंडगेपद्माकर तामगा . | ५५ |
| [illegible] | 'एसईझेड' या कादंबरीतून बदलत्या पर्यावरणाचे झालेले चित्रण | प्रा.हरेंद्र सोष्टे | ६० |
| १६. | समकालीन मराठी आदिवासी कवितेतील वेदना व विद्रोह | प्रा.डॉ.एकनाथ वैजनाथ भिंगोले | ६४ |
| १७. | वंग्रामगीता :राष्ट्रसंत तुकडोजी महाराज . | ज्ञानेश्वर बाबाराव बोहरूपी | ६९ |





Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# 'एसईझेड' या कादंबरीतून बदलत्या पर्यावरणाचे झालेले चित्रण

प्रा.हरेंद्र सोष्टे
मराठी विभाग प्रमुख,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता.कल्याण, जि.ठाणे

मराठीतील ग्रामीण साहित्यिक प्रा.शंकर सखाराम पाटील यांची सप्टेंबर २००७ मध्ये प्रकाशित झालेली 'एसईझेड' (सेझ) ही एक समकालिन वास्तवाचा वेध घेणारी महत्वाची कादंबरी आहे. साहित्यात नाविन्यपूर्ण विषयावर लिहिलेली ही कादंबरी विशेष चर्चेत राहिली तसेच वाचकप्रिय ठरलेली आहे. एसईझेड (विशेष आर्थिक क्षेत्र Special Economic Zone) ही विकास योजना भारतासारख्या विकसनशील देशात विकास व्हावा, म्हणून आणली परंतू भारतासारख्या कृषिप्रधान देशात येऊ घातलेल्या या सेझ मुळे इथली ग्रामसंस्कृती, कृषीसंस्कृती आणि पर्यायाने येथील सुजलाम, सुफलाम पर्यावरण उध्वस्त होत आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली वर्षानुवर्ष उत्पादन देणाऱ्या सुपिक शेतजमिनी बळकावून, शेतकऱ्यांना देशोधडीला लावून ही भांडवलदारी आधुनिक संस्कृती येथील नैसर्गिक जीवन संपविण्याचा प्रयत्न करते आहे. सेझमुळे महाराष्ट्रातील कोकणसारख्या निसर्गने सर्वसंपन्न असणाऱ्या भूप्रदेशात कोणकोणते प्रश्न निर्माण होवू शकतात याचे यथार्थ वास्तववादी दर्शन घडविणारी 'सेझ' ही एक महत्वाची कादंबरी आहे. या कादंबरीतील आशयसूत्रांचा बदलत्या पर्यावरणीय परिणामाचा आढावा घेण्यापूर्वी सेझ विषयक भूमिकेची पार्श्वभूमी पाहणे महत्वाचे ठरते.

साधारणतः १९९० नंतर भारताच्या अर्थकारणात राजकारणात आमूलाग्र बदल झाले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे विविध क्षेत्रात लक्षणीय परिवर्तने झाली. देशाचे एकूणच राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बहुराष्ट्रीय कंपन्या, मोठ मोठे उदयोगपती, परकिय व्यापारी यांना मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावावर सवलत देणे सुरु झाले हे होत असतांना मात्र पर्यावरणीय निर्बंधांना शिथील करण्यात आल्याचे दिसते. सेझच्या या रेट्यात येथील जंगले, समुद्र किनारपट्टी, नदया, तसेच अन्न धान्यात अधिक सुपिक असणारे भूप्रदेशही सुटले नाहीत.

विशेषतः ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या जगण्याचा आधार असलेल्या शेतजमिनी हया सेझमुळे धोक्यात आल्या. सन २००५ मध्ये हा कायदा अधिकृतरित्या संमत करण्यात आला. सन २००६ पासून या कायदयाची अंमलबजावणी सुरु झाली. जगात महासत्ता बनण्याच्या प्रयत्नात निसर्गाशी नाते सांगणाऱ्या मानवा भोवतीच्या पर्यावरणावर मोठे अरिष्ठ उभे राहीले. देशातील राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशातील हजारो एकर जमिनी हस्तांतरित करुन 'सेझ' आणण्याचे प्रयत्न होवू लागले. यामध्ये उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल तसेच महाराष्ट्रातील कोकण प्रांतातील मुंबई जवळ असणाऱ्या अनेक जमिनी हस्तांतरित करण्याचे सुरु झाले. यामुळे विस्थापितांचे अनेक प्रश्न निर्माणही झाले आहेत. छत्तीसगड भागात असंख्य आदिवासींना आपला देश सोडून विस्थापित व्हावे





लागले आहे. महाराष्ट्रात मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने रायगड जिल्हयातील नवी मुंबई, पेण, पनवेल, उरण या भागातील अनेक भूभाग सेझखाली संपादित करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. याला विरोध म्हणून अनेक आंदोलने तीव्र विरोधात उभी आहेत. मात्र मुक्त बाजारपेठ आणि विकासाच्या नावाखाली सर्व सामान्य शेतकऱ्यांचं, सामाजिक कार्यकर्त्यांचं हे बंड थोपविण्याचे अनेक साम, दाम, दंड प्रयत्न व्यवस्थेकडून केले जात आहे.

यासर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर शंकर सखाराम पाटील यांची एसईझेड ही कादंबरी वास्तववादी नोंदीची साक्ष देते. सेझच्या अनुषंगाने बदलत्या पर्यावरणाचा वेध घेते त्याबरोबरच जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्याचे होणारे परिणामही अधोरेखित करते. मराठी साहित्यात विशेषतः ग्रामीण साहित्यात येथील कृषीसंस्कृती आणि पर्यावरण यांच्या होत जाणाऱ्या ऱ्हासाचे आणि तद्अनुषंगाने बदलांचे चित्रण अनेक कथा कादंबरी आदी कथात्म साहित्यातून झालेले पहावयास मिळते. विशेषतः मराठीतील प्रादेशिक वळणाच्या कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीऱ्यांतून पर्यावरण संस्कृती बदलांचा आढावा घेतलेला दिसतो. मराठीत ग्रामीण जीवन जाणीवा व्यक्त करणाऱ्या ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यात पर्यावरण विषयक विचार प्रामुख्याने आढळून येतो. यामध्ये बा.सी.मर्ढेकर यांची 'तांबडी माती' (१९४३), पाणी (१९४८), व्यंकटेश माडगुळकर यांची 'बनगरवाडी'(१९५५) आदी कादंबऱ्यांमध्ये लोकजीवन, लोकसंस्कृती आणि निसर्गदत्त पर्यावरण याचे यथार्थ चित्रण येते.

१९६० नंतर मनोहर तल्हार, रणजित देसाई, शंकर पाटील, रा.रं.बोराडे, आनंद यादव, ना.धों.महानोर अशा सारख्या साहित्यिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामाजिक वास्तव समर्थपणे चित्रित केले आहे. यंत्र संस्कृतीचा ग्रामीण जीवनावरील परिणाम (गोतावळा), औद्योगिकरणामुळे खेडी ओस पडणे, आधुनिकीकरणामुळे ढासळलेला पर्यावरणाचा समतोल यातुन शेतकऱ्यांच्या पदरी आलेले नैराश्य आदी रखरखीत वास्तव या काळातील कादंबऱ्यांतून येते.

२००६ पासुन विशेष चर्चेत असणारा कृषीसंस्कृतीच्या मुळावर उठलेला, शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा, पर्यावरणाचा ऱ्हास करु बघणारा विशेष आर्थिक क्षेत्र मध्यप्रदेश, बंगाल आणि विशेषतः महामुंबई प्रकल्पाच्या माध्यमातून रायगड येथील उरण, पनवेल, अलिबाग या भागात आला. येथील भूमिपुत्र शेतकरी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते यांनी सेझ विरोधात लढा उभारला. प्रा.शंकर सखाराम हे स्वतः सेझग्रस्त असल्याने 'सेझ' मधुन आलेल्या विविध अनुभवांना सामोरे गेले आहेत. 'सेझ' मध्ये शेतकऱ्यांच्या सुपिक जमिनी जाणार आहेत, शेतकऱ्यांच्या जमिनी भांडवलदारांच्या हाती जातील, खारेपाटातील निसर्ग संपन्न गावे उध्वस्त होतील या अस्वस्थ जाणीवेने शंकर सखाराम पाटील यांनी 'एसईझेड' ही कादंबरी लिहिली आहे.

'चंद्रकांत थळे' हया कृषीसंस्कृतीत वाढलेल्या शेतकरी कुटूंबातून वर आलेल्या पदवीधर, शिक्षीत, बेरोजगार तरुणांच्या संघर्षाची ही कथा आणि या निमित्तमात्रे उध्वस्त



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane. 421 601

होत जाणारी कृषी संस्कृती अन् कोकणातील समृध्द पर्यावरणाच्या ऱ्हासाची ही कथा आहे. शेतकरी कुटूंबाच्या पार्श्वभूमिवर आर्थिक उत्कर्षाची स्वप्ने बघणारा हा धडपडया तरुण शेती आई वडीलांवर सोपवून नोकरी करु बघतो. पण भ्रष्टाचार, वशिलेबाजपणा पाहून तो नाऊमेद होतो. पुढे तो शेतीपूरक कुक्कुटपालन व्यवसाय करण्याचा निर्णय घेतो. पण 'बर्ड फ्ल्यु' या साथीच्या आजाराने हा व्यवसाय बंद होतो. पुढे 'सेझ' चे संकट उभे राहताच त्याचा संघर्ष परिसिमा गाठतो.

'सेझ' विरोधात प्रत्यक्ष लढा देत असतांना कादंबरीतून 'सेझ' हा विषय अत्यंत परिणाम कारकरित्या सविस्तरपणे मांडला आहे. या कादंबरीत आलेली एसईझेड ग्रस्त गावे, येथील प्रादेशिकता, निसर्ग, सण, उत्सव, ग्रामसंस्कृती ही वास्तवीकच आहेत. यातील कुटूंबाची गुजरान शेतीशी निगडीत आहे. शेळया, बकऱ्या पाळून उदरनिर्वाह करणारी कुटूंबे आहेत. सेझच्या भूसंपादनात शेतीच नष्ट होणार आहे असे जाणवल्यावर हे पशुधन नष्ट होणार आणि परिणामत: उदरहनिर्वाहाचे प्रश्न उभे राहणार याची जाणीव नायकाला प्रकर्षाने होते. कादंबरीच्या प्रारंभीच नायक चंदु याला स्वप्नावस्थेतून जागा होतांनाच्या प्रसंगातून उभे करतांना त्याची शेतजमीन, बकरी, कोंबडी यांचा संदर्भ आला आहे. आधुनिक काळात छोटया मोठया गोष्टींमुळे गरीब शेतकऱ्यांच्या पोटावर कसा पाय येतो हे लेखकाने काही प्रसंगात दाखवून दिले आहे. हल्ली दुधाच्या तर, अगदी दही, तुपाच्या पिशव्या विक्रीला आल्याने शेतकऱ्यांनी कष्टांनी पाळलेल्या गाईगुरांच्या दुधाला कुणी विचारत नाही.

कोकणातील पाणी समस्येवरही ही कादंबरी भाष्य करते ''कोकणात देशापेक्षाही जास्ती पाऊस पडतो, पण इथं ना पाणी अडवणं, ना पाणी जिरवणं, ना मोठी धरण, ना विहिरी, सगळी धरणे तिकडं देशावर, इथ कोकणात नुसत्या नदया'' चंदुच्या या बोलण्यावर कासार तात्या म्हणतात, ''कोन रं लक्ष देतंय कोकनाकडं. आपली खुर्ची सांभाळावी बस'' राजकिय स्वार्थापोटी खुर्ची सांभाळणाऱ्या पण विकासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजकिय स्थितीवर कादंबरीत भाष्य येते.

विविध घटनाप्रसंगातून वास्तवाच्या पातळीवर विविध स्तरांचा वेध ही कादंबरी घेत जाते. सेझच्या परीक्षेत्रात येणाऱ्या कंपन्याचे घातक परिणाम, वाढती महागाई, लोडशेडींगचा ज्वलंत प्रश्न, शहरी चंगळवादी, भोगवादी जीवनशैलीचे अनुकरण, कोयनाप्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन, वाढती मॉलसंस्कृती, गावगाडयात होत असलेले बदल, मच्छिमारांच्या उद्योगधंदयावर लादलेले निर्बंध अशा अनेक प्रश्नांवर या कादंबरीत परखडपणे भाष्य केले आहे. कारखानदारीने वाढत चाललेले प्रदुषण यामुळे शेतीवर होणारे परिणाम ''हल्ली या कारखान्यांचे धुरान सगळा भाजीपाल्याचा वाटोळा व्हईत चाललाय'' ही जाणीव कादंबरीतील पात्रांना होते. सदाफुली आणि तत्सम फुलझाडांवर सातत्याने येणाऱ्या किडी, दिवसें दिवस नविन येणारे रोग हे प्रदुषणाने आले आहेत थळचा आर.सी.एफ, धरमतरची निप्पॉन कंपनी सकाळ संध्याकाळ काळडोंम धुर ओकतात त्यामुळेच हिरवा पट्टा काळा पडत चालल्याचे नमूद केले आहे.





या भागात पारंपरिक चालत आलेली मिठागरे बंद पाडण्याचा कावा या लोकांच्या लक्षात येतो. ''एवढी वर्षे पिढयांनपिढया लोक आगारातील मिठागरात पिकवलेले मीठ खात, कुणी मिठाच्या विकाराने मेला नाही, मग आताच आयोडिन युक्त मीठ कशाला पाहिजे'' या संवादातून त्यांना झालेली जाणीव दिसून येते.

ग्रामीण जीवनातील सण, उत्सव, रुढी, परंपरा आणि त्यांचं निसर्गाशी असलेलं नातं याची अनेक वर्णने या कादंबरीत येतात. वैशाखी पौर्णिमेला भरणारी गावची जत्रा, पिठोरी अमावस्या, गटारी अमावस्या, गणेशोत्सव, दिवाळी आदी सण, शेत लावणीच्या वेळी म्हटली जाणारी गाणी, भारुडं, लग्नातील धवळे, शेतकऱ्याच्या आरोग्याची काळजी घेवून झाडपाल्याचे औषध देणारे वैदू, इर्जिकसारख्या सहकार्याच्या प्रथा, शेतकऱ्याच्या भोवतीचा गोतावळा(पशुधन) हे सर्व 'सेझ' आल्याने कसे नष्ट होत गेले याचे वास्तववादी चित्रण ही कादंबरी करते.

एकुणच या कादंबरीचा पर्यावरणीय बदलांच्या दृष्टीने अभ्यास करता पुढील निष्कर्ष हाती येतात :

शंकर सखाराम पाटील यांची 'सेझ' कादंबरी बदलत्या पर्यावरणाचा आणि जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण झाली आहे.

विशेष आर्थिक क्षेत्राच्या निमित्ताने ग्रामीण भागातील लोकांचे जनजीवन बदलते आणि त्यांच्या जगण्याचा धारणाही बदलल्या.

सेझ पुर्वीच्या कादंबऱ्यात निसर्गाची वर्णने येतात तर सेझ मधुन निसर्गाचे बदलते स्वरुप पहावयास मिळते.

सेझच्या माध्यमातून उध्वस्त होणारी ग्रामसंस्कृती आणि पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासावर कादंबरी भाष्य करते.